सुशिक्षित बेराजगारांना आर्थिक सहाय्य" योजनेत सुधारणा करुन ती "बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना आर्थिक सहाय्य" अशा सुधारित स्वरुपात राबविणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**

रोजगार व स्वयंरोजगार विभाग

शासन निर्णयः क्र.इएसई-२००१/प्र.क्र.१५०(भाग-२)/रोस्वरो-१

नवीन प्रशासन विभाग, १४ वा मजला,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांकः ११ फेब्रुवारी, २००४.

**वाचाः** १) शासन निर्णय, उद्योग,उर्जा व कामगार विभाग, क्रमांक इएमपी १४७८/ ३४९३/आएनडी.१३, दिनांक ३० नोव्हेंबर,१९७८.

२) शासन परिपत्रक, उद्योग,उर्जा व कामगार विभाग, क्रमांक पीटीई १०७८/ १४६९/उद्योग-१३, दिनांक २६.१२.१९७८.

३) शासन निर्णय, उद्योग,उर्जा व कामगार विभाग, क्रमांक पीटीई १०७८/ १४७९/उद्योग-१३, दिनांक १२ मार्च १९७९.

४) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र.पीटीई- १०८२/१६७९)/सेयो-१, दिनांक ०६ जुलै, १९८३.

५) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र.पीटीई१०८३/५०१८(४)/सेयो-१, दिनांक ३१ ऑगस्ट, १९८४.

६) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्र.पीटीई- १०९१/(४०६)/ सेयो-१, दिनांक २१ मार्च, १९९५.

७) शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्र.धोरण-२०००/प्र.क्र.१५८/ रोस्वरो-१, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०००.

८) शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्र.रोस्वरो-२००२/प्र.क्र.२६७/ रोस्वरो-१, दिनांक १७ ऑगस्ट,२००२

**प्रस्तावनाः-**

सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य देण्याच्या राज्य शासनाच्या योजनेनुसार, मूळ योजनेच्या "भाग अ" नुसार पदवीधर, पदविकाधारक व पदव्युत्तर उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील त्यांच्या नांव नोंदणीच्या एक वर्षाच्या कालावधीनंतर दरमहा रुपये ३००/- मानधन तीन वर्षाच्या कालावधीकरीता किंवा नोकरी लागेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तेव्हापर्यंत देण्यात येते. त्याकरीता त्यांना महिन्यातून पंधरा दिवस किमान चार तास अल्प स्वरूपाचे काम करावे लागते. तर मूळ योजनेच्या "भाग-ब" नुसार एस.एस.सी. व तत्सम परीक्षा उत्तीर्ण सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील त्यांच्या नाव नोंदणीच्या एक वर्षाच्या कालावधीनंतर दरमहा रु.१००/- प्रमाणे आर्थिक सहाय्य तीन वर्षाकरिता किंवा नोकरी लागेपर्यंत यापैकी जे आगोदर घडेल तेव्हापर्यंत देण्यात येते. हे मानधन / आर्थिक सहाय्य बेरोजगारांना नोकरी शोधण्यासाठी येणारा खर्च भागविता यावा या प्रमुख उद्देशने देण्यात येत होते. तथापि, संगणकीकरण, आधुनिकीकरण, जागतिकीकरण इ. कारणांमुळे नोकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे अपेक्षित उद्दिष्ट साध्य होत नसल्याने काळाच्या गरजेनुसार या योजनेत सुधारणा करण्याची आवश्यकता निर्माण झाली.



एचसी १५८-५

२. बेरोजगारीचा ज्वलंत प्रश्न हाताळण्यासाठी शासनाने ऑक्टोबर, २००० मध्ये रोजगार व स्वयंरोजगाराचे नवीन धोरण अंगिकारले आहे. या नवीन धोरणानुसार जनतेच्या दैनंदीन गरजा भागविण्यासाठी सेवा क्षेत्रात असलेला वाव लक्षात घेवून बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. या संस्थांना आर्थिकदृष्ट्या बळकट करण्याची आवश्यक्ता विचारात घेवून शासनाने १७ ऑगस्ट, २००२ च्या शासन निर्णयाद्वारे शासकीय/निमशासकीय कामे देण्याबाबत विविध विभागांना सूचना दिल्या आहेत व त्यास अनुसरुन विविध प्रशासकीय विभागांनी आदेशही निर्गमित केले आहेत. या सहकारी सेवा संस्थांना व्यवस्थापकीय खर्चासाठी काही अनुदान दिल्यास त्या अधिक जोमाने काम करु शकतील या उद्देशाने सहकारी सेवा संस्थांना "व्यवस्थापकीय अनुदान" देण्याची बाब शासनच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

राज्यात सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य देण्याच्या योजनेत सुधारणा करुन शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या नवीन धोरणातंर्गत बेरोजगारांनी स्थापन केलेल्या सहकारी सेवा संस्थांना त्यांचे **कार्यालय स्थापन करणे, कार्यालयासाठी आवश्यक असलेले फर्निचर, दूरध्वनी, विद्युत जोडणी, विविध परवाने मिळविणे, संस्थेचा प्रसार व प्रचार इत्यादी प्राथमिक स्वरूपाची कामे करण्यासाठी येणारा खर्च भागविण्याकरीता** बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना प्रती सदस्य प्रती वर्षी रु.१२००/- याप्रमाणे किमान अकरा सदस्यांच्या सेवा संस्थेस वार्षिक रु.१३,२००/- प्रमाणे तीन वर्षाकरीता व्यवस्थापकीय अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तसेच सेवा संस्थेत अकरा पेक्षा जास्त सदस्य असल्यास प्रती सदस्य प्रती वर्षी रु.१२००/- प्रमाणे वाढीव व्यवस्थापकीय अनुदान देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. सुधारीत योजना, योजनेच्या अटी व शर्ती इ. बाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

**(अ) योजनेचे नांवः-**

सुधारित योजनेचे नांव **"बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना आर्थिक सहाय्य योजना"** असे आहे.

**(ब) योजनेचा उद्देशः-**

या योजनेचा उद्देश शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या नवीन धोरणातंर्गत बेरोजगारांनी स्थापन केलेल्या सहकारी सेवा संस्थांना त्यांचे **कार्यालय स्थापन करणे, कार्यालयासाठी आवश्यक असलेले फर्निचर, दूरध्वनी, विद्युत जोडणी, विविध परवाने मिळविणे, संस्थेचा प्रसार व प्रचार इत्यादी प्राथमिक स्वरुपाची कामे करण्यासाठी येणारा खर्च भागविण्याकरिता** सहकारी सेवा संस्थांना आर्थिक सहाय्य देणे असा आहे.

**(क) सुधारित योजनेचा लाभ कोणास मिळेलः-**

ज्या उमेदवारांनी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात नांव नोंदविलेले आहे, अशा किमान ११ बेरोजगारांनी एकत्र येऊन सहकारी सेवा संस्था स्थापन करुन तिची सहकारी संस्था कायदा, १९६० अन्वये नोंदणी केली आहे, अशा सहकारी सेवा संस्थांना या योजनेचा लाभ मिळेल.

**(ड) आर्थिक सहाय्याची रक्कम व तिचे वाटपः**

बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना प्रती सदस्य प्रती वर्षी रु. १२००/- प्रमाणे किमान अकरा सदस्यांना एकूण रु. १३,२००/- इतकी रक्कम व्यवस्थापकीय अनुदान (खेळते भांडवल नव्हे) स्वरुपात अर्थ सहाय्य अनुज्ञेय राहील व ही रक्कम शासनाकडून उदाहरणादाखल खालीलप्रमाणे तीन वित्तीय वर्षात व तीन हप्त्यात देण्यात येईलः-

| वर्ष | संस्थेत ११ सदस्य असल्यास व्यवस्थापकीय अनुदान | |
|---|---|---|
| | हप्ता | रक्कम |
| पहिले | पहिला हप्ता | १२०० x ११ = १३,२०० |
| दुसरे | दुसरा हप्ता | १२०० x ११ = १३,२०० |
| तिसरे | तिसरा हप्ता | १२०० x ११ = १३,२०० |
| | एकूण | रुपये ३९,६०० |

यांप्रमाणे संस्थेने तीन वर्षे पूर्ण केल्यास अकरा सदस्यांच्या संस्थेस एकूण रु.३९,६००/- इतके अनुदान प्राप्त होईल. यामध्ये संस्थेत अकरा पेक्षा जास्त सदस्य असल्यास त्याप्रमाणात वाढीव अनुदान देण्यात येईल. संस्थेची वार्षिक उलाढाल ही खर्चाच्या पावत्या, मिळालेल्या कामाचा तपशील व वार्षिक ताळेबंद इत्यादी बाबी तपासून ठरविण्यात येईल. व्यवस्थापकीय अनुदानाचे वाटप संबंधित जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत करण्यात येईल

**(इ) अनुदान मिळण्यासाठी अटी व शर्ती :-**
सहकारी सेवा संस्थांना अनुदान मिळण्यासाठी खालील अटी व शर्ती विहित करण्यात येत आहेत:-

(१) सेवा संस्था स्थापन करतेवेळी सर्व सभासद हे बेरोजगार असणे तसेच त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात नोंदणी केलेले असणे आवश्यक आहे.

(२) सेवा संस्था दिनांक ०१ जानेवारी, २००१ रोजी किंवा त्यानंतर नोंदणीकृत केलेली असावी व त्यात किमान अकरा सभासद असावेत.

(३) सेवा संस्थेचे सदस्य हे एकापेक्षा जास्त सेवा संस्थेचे सदस्य नसावेत.

(४) दुस-या व तिस-या वर्षीचे अनुदान देण्यापूर्वी संबंधित संस्थेने आदल्या वर्षीच्या वार्षिक उलाढालीचा तपशील व लेखा परिक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

(५) सेवासंस्थेने राष्ट्रीयीकृत/सहकारी बँकेत खाते उघडणे आवश्यक आहे. शासनाकडून सदर योजनेतंर्गत दिल्या जाणा-या आर्थिक सहाय्याची रक्कम संस्थेच्या खात्यातच जमा केली जाईल.

**(फ) योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती:-**
या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.:-

(१) बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्था विहित नमुन्यामध्ये **(परिशिष्ट-'अ')** आवश्यक कागद पत्रांसह स्थानिक जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे अर्ज करतील.

(२) सदर अर्जाची छाननी संबंधित विभागीय उप संचालक, रोजगार व स्वयंरोजगार यांच्या अध्यक्षतेखालील समिती करील. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.:-
अ) विभागीय उप संचालक, रोजगार व स्वयंरोजगार. -अध्यक्ष.
ब) जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था किंवा त्यांचे प्रतिनिधी -सदस्य.
क) संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक संचालक/जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, -सदस्य सचिव.

(३) सदर समितीने पात्र सहकारी सेवा संस्थांची निवड केल्यानंतर संबंधित सहाय्यक संचालक / जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिका-यामार्फत अनुदानाचे वितरण विनाविलंब करण्यात येईल.

(४) दुस-या व तिस-या वर्षीचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यापूर्वी संबंधीत सहकारी सेवा संस्था प्रत्यक्षात कार्यरत आहे याची खात्री रोजगार व स्वयंरोजगार यंत्रणेतील अधिका-यामार्फत / कर्मचा-यामार्फत संस्थेच्या कार्यालयास दिलेल्या प्रत्यक्ष भेटीच्या अहवालाच्या आधारे करण्यात यावी.

(५) या योजनेच्या अंमलबजावणीचे नियंत्रक आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई, हे राहतील. या योजनेसाठीचा निधी आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार यांचेकडे सुपूर्त करण्यात येईल व ते संबंधीत जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिका-यांकडे आवश्यकतेनुसार निधी वितरीत करतील. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी याबाबतच्या खर्चाची विवरणपत्रे दरमहा उप संचालक, रोजगार व स्वयंरोजगार, विभागीय मुख्यालय यांचेमार्फत आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार यांना सादर करतील. आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार, हे दर महा खर्चाचे संकलीत विवरणपत्र शासनास सादर करतील.

२. मूळ योजना व नवीन सुधारित योजनेचा एकत्रित खर्च दरसाल रुपये २५ कोटीपेक्षा जास्त होवू नये, या दृष्टीने आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय यांनी योजनांचे नियोजन करावे व त्याप्रमाणे अर्थसंकल्पात योजनेतर तरतूद प्रस्तावित करावी.

३. सुधारित योजनेची अंमलबजावणी प्रथम तीन वर्षासाठी अनुज्ञेय राहील व योजनेच्या मध्यावधी आढाव्यानंतर ती पुढे चालू ठेवावयाची किंवा नाही याबाबत विचार करण्यात येईल.

४. अपात्र सहकारी सेवा संस्थांना निधीचे वाटप केल्याचे आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

५. या शासन निर्णयाच्या दिनांकापासून सदर सुधारित योजना अंमलात येत असून पूर्वीची "सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य योजना" बंद करण्यात येत आहे. मूळ योजनेअंतर्गत "भाग-अ" व "भाग-ब" च्या तहसिलदारांकडे पाठविलेल्या याद्या याद्वारे रद्द करण्यात येत आहेत. मूळ योजनेनुसार सध्या काम करीत असलेल्या लाभार्थ्यांना त्यांचा तीन वर्षांचा कालावधी पूर्ण होईपर्यंतच व ज्यांना मानधनाची थकबाकी द्यावयाची आहे त्यांनाच मानधन देण्यात येईल.

६. मूळ योजनेवर तसेच सुधारीत योजनेवर होणारा खर्च मागणी क्रमांक झेडए- १ - "२२३० कामगार व सेवायोजन, ०२ सेवायोजन, ००४, संशोधन, सर्वेक्षण व सांख्यिकी, (०१)(०१) सेवायोजन रोजगार उपलब्धताविषयक माहिती व युवक रोजगारविषयक सेवा (२२३० ११०७), ४० शिष्यवृत्त्या व विद्यावेतने" या लेखाशीर्षाखालील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. ६८/२००४, व्यय५, दिनांक ४ फेब्रुवारी, २००४ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(ग.गो.पंचभाई)**
शासनाचे सह सचिव,